# बृहन्मुंबई महानगरपालिका

## नियोजन विभाग

## जाहिरात

## महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावयाच्या जाहिरातीचा मसूदा

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील जेंडर बजेटच्या महिला व बाल कल्याण योजनांच्या अंमलबजावणीसाठी ११ महिन्यांच्या कालावधीकरिता कंत्राटी तत्वावर (ठोक मानधनावर) 'समुदाय संघटक' पदाकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अनु. क्र. | पदनाम | पदांची संख्या | मासिक मानधन | वय | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|---|
| १ | समुदाय संघटक | ११३ | रु.२०,०००/- प्रतिमाह | **खुल्या प्रवर्गाकरिता** १८ ते ३८ वर्ष **मागास प्रवर्गाकरिता** १८ ते ४३ वर्ष<br><br>सुवर्ण जयंती योजना /दीनदयाळ अंत्योदय योजने अंतर्गत काम केलेल्या उमेदवारांसाठी २ वर्षे शिथीलक्षम. | १. निम्नतम शैक्षणिक अर्हता: कोणत्याही शाखेतील पदवी. तथापि, समाजशास्त्र विषयातील पदवी (BA. Sociology) अथवा समाजकार्य विषयातील पदवी (BSW) असल्यास प्राधान्य देण्यात येईल.<br>२. सामाजिक क्षेत्रामध्ये स्वयंसेवी संस्थेमध्ये किमान २ वर्ष काम केल्याचा अनुभव आवश्यक.<br>३. शासकिय मान्यता प्राप्त संस्थेचे मराठी टंकलेखनाचे प्रति शब्द ३० व इंग्रजी टंकलेखनाचे प्रति शब्द ३० प्रमाणपत्रास प्राधान्य.<br>४. शासनाच्या नियमाप्रमाणे एम.एस.सी.आय.टी. परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक किंवा एम.एस.ऑफिस, पॉवर पॉईट, वर्ड, एक्सेल यांचे ज्ञान आवश्यक. तथापि, संबंधित प्रमाणपत्र अनिवार्य.<br>५. मराठीचे ज्ञान आवश्यक. |

**अर्ज भरण्याची पध्दत** - अर्जदाराने सुवाच्च स्वहस्ताक्षरात आपल्या अर्जात स्वत:चे नाव, वय, जन्म दिनांक, जात / जातीचा प्रवर्ग, शैक्षणिक अर्हता तसेच अनुभव नमूद करुन अर्जावर स्वत:चे छायाचित्र लावून सर्व आवश्यक प्रमाणपत्रांच्या जसे शैक्षणिक प्रमाणपत्र तसेच जात व जात वैधता प्रमाणपत्राच्या प्रती, शाळेचा दाखला इत्यादी कागदपत्रे साक्षांकीत करून अर्जासोबत जोडण्यात यावीत. अनुसूचित जाती व अनुसुचित जमाती प्रवर्गा व्यतिरिक्त इतर सर्व मागासप्रवर्गाच्या उमेदवारांनी तसेच खुल्या प्रवर्गातील महिला व आर्थिक दुर्बल घटक प्रवर्गाच्या उमेदवारांनी ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिका-यांचे नवीनतम प्रमाणपत्र (Latest Non-Crimiliar Certificate) कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

Scanned with CamScanner

उमेदवाराने अर्जावर संपर्क साधण्याकरीता भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी नमूद करणे आवश्यक आहे. अर्ज स्विकारण्याची अंतिम तारिख **२८.०६.२०२२** आहे.

उमेदवारांनी स्वत: खात्री करावयाची आहे की, ते अर्ज करीत असलेल्या पदासाठी विहित अर्हता व अटींची पूर्तता करीत असून पात्र आहेत.

सदर पदावरील नियुक्ती ही संपूर्णत: कंत्राटी पध्दतीवर असून मासिक ठोक मानधन रु. २०,०००/- प्रती माह इतके असेल तसेच इतर कोणतेही भत्ते व आर्थिक लाभ अनुज्ञेय असणार नाही.

**रिक्त पदांचा तपशील** - पदाचे नाव - समुदाय संघटक ; एकूण रिक्त पदे - ११३

## सदर ११३ पदांचे सामाजिक आरक्षण व अनुशेष

| "समुदाय संघटक" एकूण पदे ११३ | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | आदुघ | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| विहित आरक्षण ५२% | १५ | ८ | ३ | ३ | ४ | २ | २ | २२ | ११ | ४३ | ११३ |
| कार्यरत कर्मचारी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| अनुशेष | १५ | ८ | ३ | ३ | ४ | २ | २ | २२ | ११ | ४३ | ११३ |

## सदर ११३ पदांचे समांतर आरक्षण

| समांतर आरक्षण | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | आदुघ | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | ४ | ४ | २ | २ | २ | १ | १ | ८ | ३ | १५ | ४२ |
| ३० % महिला आरक्षण | ५ | २ | १ | १ | १ | १ | १ | ७ | ३ | १३ | ३५ |
| माजी सैनिक १५ % | २ | १ | 0 | 0 | १ | 0 | 0 | ३ | २ | ६ | १५ |
| भुकंपग्रस्त २ % | ० | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | १ | १ |
| प्रकल्पग्रस्त ५ % | १ | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | १ | १ | २ | ५ |
| खेळाडू ५ % | १ | ० | ० | 0 | 0 | 0 | 0 | १ | १ | २ | ५ |
| अंशकालीन पदवीधर १० % | २ | १ | 0 | 0 | 0 | 0 | 0 | २ | १ | ४ | १० |

Scanned with CamScanner

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अनाथांसाठी १% | १ | | | | | | | | | | |
| एकूण | १५ | ८ | ३ | ३ | ४ | २ | २ | २२ | ११ | ४३ | ११३ |
| नि:समर्थ (दिव्यांग) व्यक्तींसाठी ५ पदे | प्रकार<br>पहिले पद - a) B-Blind (अंध)<br>LV-Low Vision (अल्पदृष्टी)<br>दुसरे पद - b) HH - Hard of Hearing (ऐकू येण्यातील दुर्बलता) ,<br>तिसरे पद - c) OA -One Arm (एक हात अस्थिव्यंगता),<br>BA- Both Arm (दोन हात अस्थिव्यंगता),<br>OL-One Leg (एक पाय अस्थिव्यंगता),<br>CP - Celebral palsy (मेंदूचा पक्षाघात),<br>LC - Leprosy Cured (कुष्ठरोगमुक्त),<br>Dw –Dwarfism (शारिरीक वाढ खुंटणे),<br>AAV - Acid Attack Victims (आम्ल हल्लाग्रस्त),<br>चौथे पद - d) SLD - Specific Learning Disability (विशिष्ट शिक्षण अक्षमता),<br>MI - Mental Illness (मानसिक आजार),<br>पाचवे पद - e) MD (Mulitiple Disability) Involving (a) to (d) above – (वरील ए ते डी मधील एकाधिक अपंगत्वांचा समावेश) | | | | | | | | | | | |
| दिव्यांगकरिता शारिरिक पात्रता | S= Sitting (बसणे), ST = Standing (उभे राहणे), RW= Reading and Writing (वाचणे व लिहिणे), H= Hearing (ऐकणे), C= Communication (संवाद साधणे),<br>MF= Manipulation with Fingers (बोटांनी हाताळणे) | | | | | | | | | | |

**कर्तव्ये व जबाबदारी**

- समुदाय संघटक हे सहाय्यक आयुक्त (नियोजन), मुख्य समाज विकास अधिकारी व समाज विकास अधिकारी यांचे नियंत्रणाखाली योजनेचे काम पाहतील.
- दैनंदिन कामकाजाचा अहवाल समाज विकास अधिकारी यांना सादर करतील.
- आपल्या कार्यक्षेत्रामधील गरजू व गरिब महिलांचे बचत गट स्थापन करणे.
- वस्तीस्तर संघ, शहर स्तरावरील समूह स्थापित करणे.
- आपल्या कार्यक्षेत्रामध्ये महिला व बाल कल्याण योजने अंतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे .
- दिव्यांग स्वयंसहाय्य गटांचे तसेच इतर स्वयंसहाय्य गटांचे बळकटीकरण करणे, तसेच त्यांना योजने अंतर्गत सेवा उपलब्ध करुन देणे.
- स्वयंसहाय्य गट आणि बँकांची संलग्नता करणे.
- शासकीय संस्थांशी समन्वय साधणे.
- योजने अंतर्गत विविध सर्वेक्षणांना सहाय्य करणे.
- योजने अंतर्गत सामाजिक संपर्क, सामाजिक मालमत्तांची देखभाल, दुरुस्ती यासारख्या विकास कामांकरिता सहाय्य करणे.
- योजने अंतर्गत अभिलेख तयार व जतन करणे.

Scanned with CamScanner

- सामाजिक स्तरावरील बैठकींचे आयोजन करणे तसेच सदर बैठकांना उपस्थित राहणे.
- कालबध्द अहवाल सादर करणे.
- समाज विकास अधिकारी यांच्या मार्फत देण्यात येणारे नविन उदिष्टे तसेच कर्तव्याचे पालन करणे.
- समुदाय संघटक कार्यक्षेत्र हे त्या महानगरपालिकेच्या विभाग क्षेत्रापुरते मर्यादित असेल.
- वरिष्ठांच्या आदेशानुसार इतर कामे.
- समुदाय संघटकास हमी पत्रातून मुक्त व्हावयाचे असल्यास, त्याने ३० दिवसांची पूर्व सूचना नियुक्ती अधिका-यास देणे आवश्यक राहील.

**इतर अटी व शर्ती** –

१. आरक्षण, अनुशेष व पदांच्या संख्येत बदल होण्याची शक्यता आहे.

२. विजा (अ),भज (ब), भज (क), भज (ड) या प्रवर्गातील विहित आरक्षण त्या त्या प्रवर्गातील कर्मचारी उपलब्ध न झाल्यास अंतर्गत परिवर्तनीय राहील.

३. उमेदवाराचा महाराष्ट्र राज्यात अधिवास असणे आवश्यक. (तहसिलदाराचे अधिवास प्रमाणपत्र आवश्यक)

४. समुदाय संघटकांना शासकीय अधिकारी / कर्मचा-यांना देय असलेल्या कोणत्याही सेवा सवलती/सोयी सुविधा अनुज्ञेय राहणार नाहीत.

५. सदर नियुक्ती ११ महिन्यांच्या कालावधीकरिता कंत्राटी तत्वावर (ठोक मानधनावर) असल्याने कोणत्याही परिस्थितीत सदरहू कंत्राटी तत्वावर नियुक्त व्यक्ती शासकीय सेवेमधे समावेश होण्याबाबत दावा करु शकणार नाही किंवा त्याबाबत न्यायालयात दाद मागू शकणार नाही.

६. शासकीय कर्मचा-याप्रमाणे अन्य कोणतेही लाभ, सेवेत समावेशन, वेतनश्रेणी, रजा, पेन्शन इ. अनुज्ञेय नसतील. समुदाय संघटकास अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे लेखीहमीपत्र लिहून दिल्यानंतरच नियुक्ती देण्यात येईल.

७. २ वर्ष अनुभव प्राप्त पुरेसे उमेदवार न मिळाल्यास अनुभवाची अट शिथील करण्याचे अधिकार महानगरपालिकेकडे असतील.

८. महानगरपालिकेकडे अर्ज सादर करताना न्यायप्रविष्ट प्रकरण, फौजदारी प्रकरण, शिस्तभंगाविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई संबंधीची माहिती महानगरपालिकेस देणे आवश्यक आहे. सदर माहिती न दिल्यास उमेदवाराची सेवा कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकार महानगरपालिकेस असतील.

९. निवड झालेल्या उमेदवारांविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिध्द झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलिस स्टेशन मार्फत सादर करणे अनिवार्य आहे.

१०. प्रस्तुत जाहिरातीला अनुसरुन मुलाखतीला उपस्थित राहणा-या उमेदवाराचे अर्ज विचारात घेतले जातील. महानगरपालिकेकडे यापूर्वी केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

११. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार मा. महानगरपालिका आयुक्त यांना आहेत.

१२. करार कालावधीत कामगिरी असमाधानकारक किंवा गैरशिस्त आढळून आल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता समुदाय संघटकांचा नियुक्तीचा करार समाप्त करण्यात येईल.

Scanned with CamScanner

१३. करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेला उमेदवार, सोपवलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावा.

१४. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारांनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे / माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

१५. दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील उमेदवारास प्राधान्य. (दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक)

१६.दिव्यांग उमेदवारांनी किमान ४०% अपंगत्व असल्याबाबतचे सक्षम प्राधिका-यांनी दिलेल्या प्रमाणपत्राची छायाकिंत प्रमाणित प्रत सादर करणे आवश्यक.

१७. सर्व आवश्यक प्रमाणपत्रांच्या जसे शैक्षणिक प्रमाणपत्र, अनुभव, मागासवर्गीय असल्यास जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र, महिला उमेदवारांनी विवाह प्रमाणपत्र तसेच नाव बदलल्याचे सरकारी राजपत्र (गॅझेट कॉपी) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र, आर्थिक दुर्बल घटक प्रमाणपत्र, दिव्यांग प्रमाणपत्र इत्यादीच्या प्रमाणित छायाकिंत प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. मात्र सदर प्रमाणपत्रांच्या मुळ प्रती कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा, उमेदवार नेमणूकीस पात्र समजला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

१८. प्राधान्यातील पात्रता धारण करणा-या उमेदवारांना निवड होण्याचा दावा करता येणार नाही. अंतिम निवड मुलाखतीनंतरच करण्यात येईल.

१९. मुलाखतीस पात्र उमेदवारांना स्वखर्चाने मुलाखतीस उपस्थितीत राहावे लागेल.

२०. मुलाखतीस पात्र झालेल्या उमेदवारांपैकी अंतिम निवड झालेल्या उमेदवारांच्या यादी व्यतिरिक्त उर्वरीत उमेदवारांची प्रतिक्षा यादी अंतिम निवड यादीच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीसाठी वैध राहील.

२१. वरील अटी व शर्ती मध्ये बदल / वाढ करण्यात आल्यास त्या सर्व समुदाय संघटक यांना बंधनकारक असतील.

**<u>अ) उमेदवारांनी खालीलप्रमाणे नमूद केलेल्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती क्रमशः अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.</u>**

१. विहित नमुन्यात पूर्णपणे भरलेला अर्ज.

२. पदवी उत्तीर्ण असल्याचे अंतिम प्रमाणपत्र/ गुणपत्रिका .

३. जन्म दाखला/ शाळा सोडल्याचा दाखला.

४. मराठी विषय घेऊन दहावी/बारावी परिक्षा उत्तीर्ण गुणपत्रिका व प्रमाणपत्र.

५. एम.एस.सी.आय.टी उत्तीर्ण प्रमाणपत्र किंवा एम.एस.ऑफिस, पॉवर पॉईंट, वर्ड, एक्सेल यांचे संबंधित उत्तीर्ण प्रमाणपत्र.

६. मागासवर्गीय उमेदवार असल्यास जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र.

७. नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र.

८. महिला उमेदवारांच्या बाबतीत विवाहीत असल्यास (विवाहाचा दाखला तसेच नाव बदलल्याचे सरकारी राजपत्र (गॅझेट कॉपी).

९. दिव्यांग उमेदवार असल्यास ४० टक्के अपंगत्व असल्याचे प्रमाणपत्र.

१०. आर्थिक दृष्टया दुर्बल घटक प्रमाणपत्र.

११. उमेदवाराचा महाराष्ट्र राज्यात अधिवास असल्याचे तहसिलदाराचे अधिवास प्रमाणपत्र.

Scanned with CamScanner

१२. उमेदवार दारिद्र्य रेषेखालील असल्यास दारिद्र्य रेषेखालील प्रमाणपत्र.

१३. इतर आवश्यक प्रमाणपत्रे.

सर्व कागदपत्रे क्रमाने जोडून पृष्ठांकनासहीत फाईलमध्ये सादर करावेत व एकूण पृष्ठांकनांची नोंद मुखपृष्ठावर लिहावी.

ब) महिला आरक्षण, महिला व बाल कल्याण विभागाच्या शा.नि. ८२/२००१/मप्रसा/२०००/प्र.क.४१५/का.२ दि. २५.०५.२००१ मधील तरतूदीनुसार राहिल.

क) एखाद्या प्रवर्गात महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे त्या प्रवर्गाच्या पुरुष उमेदवारांमधून भरण्यात येतील.

ड) अ.जा व अ.ज. प्रवर्गातील उमेदवार वगळता अन्य मागास प्रवर्गातील उमेदवारांनी तसेच महिला आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणा-या खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिका-यांनी दिलेले नविनतम प्रमाणपत्र भरतीच्या वेळेस सादर करावे.

**निवड प्रक्रिया**

१) समुदाय संघटक या पदाबाबत प्रमुख वृत्तपत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात येईल आणि अर्ज मागविण्यात येतील.

२) प्राप्त अर्जांची प्रथमिक छाननी करण्यात येईल.

अपूर्ण लिहिलेले व अपूर्ण कागदपत्र जोडलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

३) मुलाखतीस पात्र उमेदवारांना ई-मेल व्दारे मुलाखतीची तारीख व वेळ कळविण्यात येईल.

४) मुलाखतीस पात्र झालेल्या उमेदवाराची गुणवत्तेनुसार नियुक्ती करण्यात येईल.

५) अपात्र ठरलेल्या उमेदवारांना कोणत्याही प्रकारे कळविण्यात येणार नाही.

६) याबाबत कोणताही पत्रव्यवहार महानगरपालिकेमार्फत करण्यात येणार नाही.

**सदर समुह संघटक या पदासाठी खालीलप्रमाणे असलेल्या निकषाप्रमाणे छाननी करण्यात येणार आहे.**

| अनु.क्र | निकष | दयावयाचे गुण | उदाहरण |
|---|---|---|---|
| १) | शैक्षणिक पात्रता | ६० गुण | ‘अ’ या व्यक्तीला जर ६० % गुण असतील तर ‘अ’ या व्यक्तीचे ६० गुणांपैकी ३६ इतके गुण होतात. त्यासाठी खालील गुणसूत्र वापरण्यात येत आहे.<br>एकूण गुण = शैक्षणिक गुण X दयावयाचे गुण $\frac{६०}{१००}$ |
| २) | अर्हता प्राप्त कामाचा अनुभव १. अर्हता प्राप्त २ वर्ष अनुभवास - १० गुण + अर्हता प्राप्त अनुभवापेक्षा अधिकच्या अनुभवास प्रतिवर्ष २ गुण असे जास्तीतजास्त १० गुण | २० गुण | जर ‘अ’ ह्या व्यक्तीला २ वर्षाच्या अनुभवाची अट आहे.<br>२ वर्ष अनुभव असणा-यास १० गुण दिले जातील.<br>जर ‘अ’ व्यक्तीला ३ वर्ष अनुभव असले तर १२ गुण,<br>४ वर्ष अनुभव असेल तर १४ गुण,<br>५ वर्ष अनुभव असेल तर १६ गुण,<br>६ वर्ष अनुभव असेल तर १८ गुण,<br>७ वर्ष अनुभव असेल तर २० गुण,<br>७ वर्षापेक्षा जास्त अनुभव असेल तरी २० गुण दिले जातील. |
| ३) | वैयक्तीक मुलाखत | २० गुण | |
| | एकूण | १०० गुण | |

Scanned with CamScanner

गुणवत्तेनुसार आणि आरक्षणानुसार निवड यादी तयार करण्यात येईल.

मुलाखतीस उपस्थित राहणा-या उमेदवारांची गठित समितीद्वारा प्रत्यक्ष मुलाखत घेऊन नियुक्तीसाठी शिफारस करण्यात येईल.

सदर अर्ज सहाय्यक आयुक्त (नियोजन) यांचे कार्यालय, ५ वा मजला, जनता क्लॉथ मार्केट इमारत, हॉकर्स प्लाझा, सेनापती बापट मार्ग, दादर (प), मुंबई-२८ येथे सर्व शनिवार, रविवार व सार्वजनिक सुटटी वगळून कार्यालयीन वेळेत सकाळी १०.३० ते ४.३० या वेळेत स्विकारले जातील. अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर प्रत्यक्ष किंवा टपालाने प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

सही/-
श्री. किरण दिघावकर
सहाय्यक आयुक्त (नियोजन)

Scanned with CamScanner

प्रति
मा.सहाय्यक आयुक्त (नियोजन)
५ वा मजला, जनता क्लॉथ मार्केट इमारत,
हॉकर्स प्लाझा, सेनापती बापट मार्ग,
दादर (प), मुंबई-४०० ०२८

------------------------या पदाकरिता अर्ज

| | | | |
|---|---|---|---|
| १. | उमेदवाराचे संपूर्ण नाव (आडनाव, स्वत:चे नाव, वडिलांचे / पतीचे नाव) | | |
| २. | पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता<br>१) सध्याचा | | गाव तालुका<br>जिल्हा पिनकोड - |
| | २) कायमचा | | गाव तालुका<br>जिल्हा पिनकोड - |
| ३. | संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक | | |
| | भ्रमणध्वनी क्रमांक | | |
| | ई-मेल आयडी | | |
| ४. | जन्मतारीख:- तारीख /महिना/वर्ष | | |
| ५. | वय :- वर्ष /महिने / दिवस | | |
| ६. | जात / पोटजात | | |
| ७. | धर्म | | |
| ८. | शैक्षणिक अर्हता | | |

| उत्तीर्ण केलेली परिक्षा | मंडळाचे / मान्यताप्राप्त विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | विषय | टक्केवारी /श्रेणी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

Scanned with CamScanner

९. अनुभव

| संस्थेचे नाव व पत्ता | कालावधी | एकूण वर्ष | सेवा सोडण्याचे कारण |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

१०. उमेदवार मागासवर्गीय आहे का? होय / नाही
(अजा,अ.ज., वि.जा(अ), भ.ज.(ब), भ.ज.(ड), वि.मा.प्र., इ.मा.व.,आ.दु.घ., खुला) ___________________

११. उमेदवार कोणत्या आरक्षण प्रवर्गातून अर्ज करु इच्छित आहे ?
अ. सर्वसाधारण / अपंग / महिला /माजी सैनिक / भुकंपग्रस्त / प्रकल्पग्रस्त / खेळाडू / अंशकालीन पदवीधर / अनाथांसाठी आरक्षण इत्यादी. _____________
ब. उमेदवार अपंग असल्यास अपंगत्वाचा प्रकार ____________

१२. आरक्षणा अंतर्गत नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र आहे किवा नाही ? ____________

१३. अवगत असणा-या भाषा (योग्य ठिकाणी √ अशी खुण करावी)

| मराठी | हिंदी | इंग्रजी | अन्य |
|---|---|---|---|
| | | | |

१४. आपणाविरुध्द न्यायप्रविष्ट प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगाविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई चालू आहे काय? होय / नाही (असल्यास थोडक्यात तपशिल द्यावा.)

१५. दारिद्र्य रेषेखाली आहात का ? होय / नाही
(असल्यास दारिद्र्य रेषेखाली प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.)

१६. अर्जासोबत जोडावयाच्या कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती
१. ____________________________________________________________
२. ____________________________________________________________
३. ____________________________________________________________
४. ____________________________________________________________
५. ____________________________________________________________

१७. अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी आहे काय ? होय / नाही

मी यान्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहिर करतो की वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यास माझा अर्ज अपात्र केल्या त्याबाबत माझी काहीही तक्रार रहाणार नाही. तसेच माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्यावर रद्द करण्यात येईल आणि माझेविरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण ----------------------- अर्जदाराची सही -----------------------------------

दिनांक -------------------------- (संपूर्ण नाव ------------------------------------------)

Scanned with CamScanner